॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि. 9 ( ) विश्वकोशाचे ज्ञान केवळ ग्रंथापूरते मर्यादित न राहता सर्वसामान्यांपर्यंत ते पोहचावे या संकल्पनेतूनच विविध विषयांच्या ज्ञानमंडळांची कल्पना पुढे आली असून मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने 60 ज्ञानमंडळे स्थापित केली असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दिलीप करंबळेकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अब्जांश तंत्रज्ञान या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ.करंबळेकर बोलत होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर, डॉ.बाळ फोंडके, डॉ.वसंत वाघ उपस्थित होते.

डॉ.करंबळेकर म्हणाले की, यापुढच्या काळात मराठी विश्वकोशाचे काम संकेतस्थळाच्या आधारावर ऑनलाईन होणार आहे. तंत्रज्ञानाच्या आधारे त्वरीत नोंदी करुन लोकांपर्यंत पोहचाव्यात यातून ज्ञानमंडळाची कल्पना पुढे आली आणि त्याची जबाबदारी त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडे सोपविण्यात आली. सध्या विज्ञान-तंत्रज्ञान विषयाचे 27 आणि कला व मानव्यशाखेचे 33 असे एकूण 60 ज्ञानमंडळे स्थापन झाली असून त्यातील 43 ज्ञानमंडळाचे काम सुरु झाले आहे. अन्य ज्ञानमंडळे स्थापनेच्या प्रक्रियेत आहेत. त्या विषयाच्या ज्ञानशाखेच्या नसलेल्या व्यक्तीला देखील सहज वाचता याव्यात अशा सोप्या मात्र बिनचुक नोंदी घेण्याचे काम सुरु झाले आहे. मुख्य ज्ञानभांडार इंग्रजीत उपलब्ध आहे, ते मराठीत उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक ज्ञानमंडळाचा लेखक हा तयार व्हायला हवा. तो लेखक वर्ग तयार करण्याचे मोठे आव्हान मंडळापुढे आहे. आज कोणताही विषय केवळ त्या ज्ञानशाखेचा म्हणून मर्यादित राहिलेला नाही तर तो आंतरशाखीय झालेला आहे. महाराष्ट्राच्या जडण-घडणीत या ज्ञानमंडळाचे योगदान निश्चित राहिल असेही डॉ.करंबळेकर म्हणाले.

उद्‌घानपर भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील म्हणाले की, अब्जांश तंत्रज्ञानासारखे क्रांतीकारी तंत्रज्ञान जे आज कृषीपासून सौंदर्य प्रसाधनापर्यंतच्या जीवनावश्यक व्यवस्थेचा भाग झाला आहे. त्याची माहिती मातृभाषेत जनसामान्यांपर्यत पोहचणे गरजेचे आहे. उद्‌घाटन सत्रानंतर डॉ.बाळ फोंडके यांनी लेखण नोंदीचे काम करताना वाचक कोण आहे हे आधी समजून घेणे गरजेचे आहे. इतर विषयाच्या लोकांनाही अब्जांश तंत्रज्ञान कळायला हवे अशा सोप्या भाषेत नोंदी घेतल्या जाव्यात. या नोंदीमध्ये वस्तुनिष्ठता अपेक्षित आहे. मत प्रदर्शन नव्हे असे ते म्हणाले. या सत्रात नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर यांनी लेखन नोंद सादरीकरण व मार्गदर्शन केले. डॉ.वसंत वाघ, डॉ.अनिल लचके यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत विद्यापीठ परिक्षेत्रातील नॅनो टेक्नॉलॉजी या विषयाचे प्राध्यापक सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.आशुतोष पाटील यांनी केले.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 9 जानेवारी, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी

`